असा. क्र. १७

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मे २, २००८/वैशाख १२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | २२६-२२८ |

दिनांक २९ एप्रिल २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



**[ किंमत : रुपये १५.०० ]**

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १६ मधील, पोट-कलम (१ड) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :— १८८८ चा मुंबई ३.

"(१ई) जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने,—

(अ) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ब) अशा प्रकारे कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

(१फ) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१ई) खालील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल.".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १० ची सुधारणा. **३.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम १० मधील, पोट-कलम (१ड) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :— १९४९ चा मुंबई ५९.

"(१ई) जर राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने,—

(अ) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ब) अशा प्रकारे कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

(१फ) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१ई) खालील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल.".

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**४.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम १५ मधील पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(४)(अ) जर, राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने,—

(एक) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(दोन) अशा प्रकारे कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

(ब) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, या पोट-कलमाखालील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल.".

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १६ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १६ मधील, पोट-कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"(१ड) जर, राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने,—

(अ) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ब) अशा प्रकारे कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

(१ई) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१ड) खालील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल.".

असा. क्र. ३४

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे २, २००८/वैशाख १२, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Third Amendment) Act, 2007 (Mah. Act No. XII of 2008.), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XII OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor, in the " Maharashtra Government Gazette ", on the 2nd May 2008).*

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

Bom. III of 1888. Bom. LIX of 1949. C.P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

WHEREAS, it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-eighth Year of the Republic of India as follows :—

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Third Amendment) Act, 2007.

Amendment of section 16 of Bom. III of 1888. **2.** In section 16 of the Mumbai Municipal Corporation Act, after sub-section (*1D*), the following sub-sections shall be inserted, namely :— Bom. III of 1888.

"(*1E*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*b*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the *Official Gazette,* declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor or for contesting an election for being a Councillor for a period of three years from the date of the order.

(*1F*) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under sub-section (*1E*) or reduce the period of any such disqualification.".

Amendment of section 10 of Bom. LIX of 1949. **3.** In section 10 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, after sub-section (*1D*), the following sub-sections shall be inserted, namely :— Bom. LIX of 1949.

"(*1E*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*b*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by order published in the *Official Gazette,* declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor or for contesting an election for being a Councillor for a period of three years from the date of the order.

(*1F*) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under sub-section (*1E*) or reduce the period of any such disqualification.".

Amendment of section 15 of C.P. and Berar II of 1950. **4.** In section 15 of the City of Nagpur Corporation Act, 1948, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely :— C.P. and Berar II of 1950.

"(*4*) (*a*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*i*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*ii*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the *Official Gazette,* declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor or for contesting an election for being a Councillor for a period of three years from the date of the order.

(*b*) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under this sub-section or reduce the period of any such disqualification.".

Mah. XL of 1965.

Amendment of section 16 of Mah. XL of 1965.

**5.** In section 16 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, after sub-section (*1C*), the following sub-sections shall be inserted, namely :—

"(*1D*) If the State Election Commission is satisfied that a person,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by the State Election Commission, and

(*b*) has no good reason or justification for such failure,

the State Election Commission may, by an order published in the *Official Gazette,* declare him to be disqualified and such person shall be disqualified for being a Councillor or for contesting an election for being a Councillor for a period of three years from the date of the order.

(*1E*) The State Election Commission may, for reasons to be recorded, remove any disqualification under sub-section (*1D*) or reduce the period of any such disqualification.".

GOVERNMENT CENTRAL PRESS, MUMBAI.